# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**दिनांक १०.३.२००६ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे (का.प.क्र.२८) इतिवृत्त**

शुक्रवार दिनांक १० मार्च २००६ रोजी स्थायी समितीची सभा मा.सभापती **श्री.काशीनाथ कोकाटे** यांचे अध्यक्षतेखाली ''मलिक अंबर स्थायी समिती सभागृह '' येथे दुपारी ३.३० वाजता ''वंदे मातरम्'' या गिताने सुरू झाली. या सभेस मा.आयुक्त व अधिकारी वर्गासह खालील सन्माननीय सभासद उपस्थित होते.

(०१) श्री. कावडे साहेबराव राणुबा
(०२) श्री. खान मुजेब मिर आलम खान
(०३) सौ. खंदारे वंदना प्रकाश
(०४) श्री. गवळी रविकांत काशीनाथ
(०५) सौ.जधव संगिता विठ्ठलराव
(०६) सौ. लता दलाल
(०७) श्री. दाभाडे मिलींद यशवंत
(०८) श्री. दिलीप नारायण गायकवाड
(०९) श्री. नासेर नहदी मोहंमद याहीया नहदी
(१०) श्री. पांडे विनायक प्रभाकर
(११) श्री. बारवाल गजनन रामकिशन
(१२) श्री. विसपुते शशांक दामोधर
(१३) श्री. रेणुकादास वैद्य
(१४) श्री. जेजूरकर संतोष सुधाकरराव
(१५) श्री. बैनाडे कंवरसिंग किसनसिंग

**<u>संवाद :</u>**

श्री.गजनन बारवाल :जकातीचे खाजगीकरण झाले त्यावेळी मी स्वत: प्रथमत अभिनंदन केलेले होते त्याच प्रमाणे मा.आयुक्ताचें सुध्दा अभिनंदन केले होते. परंतु दुर्दैवाने काही बाबी सभागृहासमोर ठेवाव्या लागतात.आज सकाळी ६ ते ९.३० वाजेपर्यंत नगरनाका येथे होतो. तेथील चित्र बघून अत्यंत वाईट वाटले. खाजगीकरण करणे यामागचा उददेश असा होता की महापालिकेचे उत्पन्न वाढवावे त्यातून विकास व्हावा. परंतू महापालिकेचे कोणतेही कर्मचारी अधिकारी वरील वेळात या नाक्यावर संबधीतावर अंकूश ठेवण्यासाठी नव्हते. तेथील जे कर्मचारी होते ते येणाऱ्या नागरीकांची फसवणूक करीत होते त्यांना त्रास देत होते. शिवीगाळ करीत होते. शिवाय काहीच्या गाडया थांबून ठेवलेल्या होत्या. लहान सहान गोष्टीसाठी दादागिरीची भाषा संबधीत ठेकेदाराचे कर्मचारी करीत होते. हे मी प्रत्यक्ष पाहिले आहे. तेथील संबधीत व्यक्ती होते त्यांना या संबधीची माहिती सुध्दा देण्यात आली तरी सूध्दा एक भंगारची गाडी तीन तासापासून जकात पावती घेतली असतांना थांबून ठेवली होती. विचारणा केली असतां ६० रूपये टन प्रमाणे जकात लागलेला आहे तो १५ रूपये के.जी. प्रमाणे लावावयास पाहिजे असे म्हटले. भंगारचा दर हा १५ रूपये किलो नाही परंतू जकात १५ रूपये किलो प्रमाणे घेण्याचा ध्यास संबधीत खाजगी अभिकर्ता करीत आहे हे योग्य नाही. सकाळी ६

वाजेपासून ९.३० वाजेपर्यंत आलेल्या बसेस मधील माल तसाच पडून होता. मोठया प्रमाणात लोक तेथे जमा झालेले होते. का थांबवून ठेवले अशी विचारना केली असता आमचे कर्मचारी ११ वाजता येतील त्यावेळी जकात पावती देवून माल पाठविला जईल असे सांगण्यात आले. एका व्यक्तीचा माल उतरविला व त्यातील एक संगणक चोरीला गेले. संबधी व्यक्तीने विचारना केली असता तेथील कर्मचारी यांनी आम्हाला माहित नाही असे म्हटले अशा प्रकारचे अडचणी निर्माण करीत आहे. जे दूध शहरात येते त्यांचेकडून शक्तीने जस्तीचे पैसे वसूल करण्यात आले. एका व्यक्तीने घरगुती सामान होते ते पूर्ण पणे बाहेर काढावयास लावले यात काही नवीन साहित्य आहे म्हणून त्या प्रमाणे जकात आकारणी केली जईल असे म्हटले.तसेच कोरीयरचे सामान सूध्दा तीन तास थांबून ठेवले होते. तेथील नागरीकांना कूणी मदत करण्यास नव्हते.. अशी परीस्थिते दिसून आलेली आहे. खाजगीकरण केले म्हणजे सर्व अधिकार त्यांना दिले काय त्याचेवर अंकूश ठेवणार आहात की नाही . माझ्या माहिती प्रमाणे जी वसूली होत आहेती बोगस पध्दतीने होत आहे असे माझे ठाम मत आहे. नागरीकांची अडवणूक होत होती. दादागिरीची भाषा वापरली जत होती. या सर्व प्रकरणाची गाभीर्याने नोंद घेवून खाजगीकरण केले असले तरी तेथे महापालिका प्रशासनाचे कोणतेही अंकूश नाही असे माझे मत आहे याची नोंद घेवून योग्य ती कार्यवाही करावी अशी विनंती आहे. जे अन्याय व्यापारी वर्ग व सामान्य नागरीकावर होत आहे तो दूर करावा.

श्री.रविकांत गवळी :सामान्य जनतेला त्रास न होता व महापालिकेचे उत्पन्न वाढेल या उद्देशाने खाजगीकरण केलेले होते. आताच स. गजनन बारवाल यांनी जी सूचना केली त्यानूसार सर्व माहिती सभागृहाला देण्यात यावी. त्या ठिकाणी महानगरपालिकेचा एकही अधिकारी नव्हता. हते तर कुठे होते? नेमलेले अधिकारी कोण होते? त्यांनी काय कार्यवाही केली?

सौ. लता दलाल :जकात खाजगीकरणाचा ठराव पास होत असतांना कोणत्याही नागरीकांना व्यापाऱ्याना त्रास होवू नये ही भावना समोर ठेवून मंजूरी दिलेली आहे तसेच ज्यांना चांगला अनूभव आहे असे महापालिकेचे अधिकारी कर्मचारी यांनी त्या त्या नाक्यावर थांबवून किती वसूली होते कशा प्रकारे केली जते यासाठी लक्ष ठेवण्याकरीता नियुक्त केलेले आहे. परंतू आताच स. श्री. बारवाल यांनी जे अनुभव नाक्यावरील मांडला तो अत्यंत दुर्दैवी आहे असे वाढते. हे सर्व घडत असतांना महापालिकेचे अधिकारी कोठे होते. अधिकाऱ्याच्या समोर हा प्रकार होत होता काय अधिकारी होते तर हा प्रकार का थांबवला नाही.खाजगीकरण झाले महापालिकेची जबाबदारी राहिलेली नाही असे म्हणून महापालिकेचे कर्मचारी हजर नव्हते का. अधिकारी तसे वागले असतील तर चौकशी करावी. हेतूत: करतात का, की आमची बदनामी व्हावी. जेहजर नव्हते त्यांची चौकशी करावी.

श्री.कवरसिंग बैनाडे :जे भंगार माल येतो त्यावर १५ रू. किलो प्रमाणे जकार आकारणी केल्यास योग्य नाही. नवीन लोंखड २२ रूपये प्रति किलोने मिळत आहे. १५ रूपये किलो प्रमाणे जकात आकारू शकत नाही हे चूकीचे असेल. खाजगीकरण करणे म्हणजे व्यापाऱ्याना व जनतेला त्रास देण्याचा हेतू त्यामागे नव्हता. जकात खाजगीकरणाच्या माध्यमतातून २० ते २२ कोटी चे जस्तीचे उत्पन्न महापालिकेस मिळणार असून

विकास कामे करता येतील.हा उद्‌देश खाजगीकरण करण्या मागे होता. नागरीकांना होणारा त्रास तो होवू नये यासाठी मा. आयुक्त यांनी दखल घ्यावी.

श्री. संतोष जेजूरकर :जे जकात नियमानूसार येतो तो भरण्यास लोक तयार असतांना शिवीगाळ करून त्यांना दमदाटी केली जते, हे योग्य नाही. याची या ठिकाणी नोंद घ्यावी.

श्री.मुजीब खान मी दौलताबाद कडून येत होतो अनेक गाडया उभ्या होत्या परंतू व्यापाऱ्याची किंवा नागरीकांची अडवणूक होत आहे असे दिसून आले नाही. महापालिकेच्या पध्दतीपेक्षा चांगल्या पध्दतीने जकात वसूल करण्याचे काम होत होते. तसेच रेल्वेस्टेशन येथेही मी प्रत्यक्ष पाहणी केली असा प्रकार झालेला समोर आलेला नाही.स.सदस्य श्री. बारवाल गजनन यांनी जे मत मांडले त्यासी मी सहमत आहे प्रशासनाचा अंकूश असणे आवशक आहे. रेल्वेस्टेशन येथे एक माल आला होता. मीही बाजूला उभा होतो. त्या मालावर १.०० प्रमाणे जकात आकारणी होणे आवश्यक असतांना महापालिकेचे कर्मचारी ५० पैसे प्रमाणे जकात आकारणी करीत होते. बाजूलाच महापालिकेचे एक अधिकारी तेथे आले व आता खाजगीकरण झालेले आहे त्यामूळे १.०० प्रमाणे जकात दयावी लागेल. यापूर्वी महापालिका ५० पैसे प्रमाणे जकात आकारणी करीत असेल. याचा अर्थ ५० पैसे जकात ही कमी घेतली जत असे व महापालिकेचे उत्पन्न कमी येत असे सभागृहात या संदर्भात मी अनेक वेळा विचारणा केली उत्तर दिले नाही. २० ते २२ लक्ष दररोजची वसूली येत असे आता संबधीत खाजगी अभिकर्त्यामार्फत जवळपास ४० लक्ष दररोजची वसूली होत आहे. परंतू यात जे दलाल लोक होते त्याची दलाली बंद झालेली आहे व ते महापालिका व नगरसेवकांच्या विरोधात वृत्तपत्रात देत आहे परंतू नगरसेवक व अधिकारी यांनी मिळून २० ते २३ कोटी ची वसूली जस्तीत जस्त मिळावी म्हणून प्रयत्न केलेले आहे. हया दलालांना जी ओरीजनल रक्कम वसूल होत आहे त्याचे दु:ख आहे. या बाबतीत जकात वसूल करतांना नागरीकांना त्रास होवू नये याची दखल प्रशासनाने घ्यावी. परंतू जे दलाल आहे ते कामात अडथळा आणण्याचा प्रयत्न करीत आहे त्यांचेवर कार्यवाही झाली पाहिजे. जे जकात खाजगीकरणाच्या माध्यमातून उत्पन्न मिळणार आहे ते विकास कामावर खर्च होणार आहे. जे वृत्तपत्रात नगरसेवकांच्या बाबतीत येत आहे त्यांचा या सभागृहाने निषेध करावा. सर्व सदस्य प्रशासनाच्या पाठीशी आहे. नगरसेवकांच्या घरावर पत्रक छापून त्यावर नगरसेवकांच्या विरोधात लिहून आले ही बाब अयोग्य असून त्याचे मी खंडन करीत आहे व या बाबीचा निषेध करावा अशी विनंती आहे.

मा.सभापती :जकात खाजगीकरण केल्यानंतर जे प्रकार नाक्यावर होत आहे त्या बाबतीत मत मांडलेले आहे. परंतू संबधीत एजन्सी व महापालिकेचा जे करार झालेला आहे तो स्पषट असा आहे. महापालिकेची एक जबाबदारी समजून स. सदस्य श्री.बारवाल यांनी नगरनाक्यावर थांबवून प्रत्यक्ष पाहणी केलेली आहे. शहराची शांतता व सुव्यवस्थेला कुठल्याही प्रकारची बाधा होणार नाही हे समोर ठेवून निर्णय घेतलेला आहे. प्रशासनास स्पषट सूचना आहे की जे कर्मचारी कार्यरत केलेले आहे सदर कर्मचारी जर शंकेचे वातावरण तयार करीत असेल तर त्याची चौकशी करावी. व जे कर्मचारी अधिकारी तेथे उपस्थित नव्हते त्याचेवर कार्यवाही करावी. जर कूणी नगरसेवकांच्या समोर अरेरावीची भाषा करीत असेल व तेथे कर्मचारी असतांना कार्यवाही होत नसेल तर संबधीत कर्मचारी यांचेवर कार्यवाही करावी. शहरातील

ज्यांना जकातीचे उत्पन्न घटविता येत होते आणि स्वार्थ साधता येत होता अशा मंडळीचा हात असावा अडथळा आणण्याचे काम करीत आहे. जकातीत वाढ व्हावी व महापालिकेचे उत्पन्न वाढवावे म्हणून निर्णय एकमताने घेतलेला आहे. कर्मचारी असेल किंवा बाहेरचे कूणी असेल हे जकात वसूलीत अडथळा आणत असतील तर त्यांचेवर चौकशी करून प्रशासनाने कार्यवाही करावी. जे निषेधचा ठराव ठेवण्या बाबत मत मांडले आहे त्यास मान्यता देण्यात येते. जकात अधिक्षक यांनी न्यायालयाचे इतर कामे न देता त्यासाठी दुसरे कर्मचारी पाठवावे परंतू जकात अधिक्षक यांनी संपूर्ण वेळात जकातीचे काम पहावे.

श्री.मुजीब खान :एकदा मी जकात नाक्यावर गेलो होतो. गरवारेचे काही लोक व संबधीत ठेकेदार याची चर्चा चालू होती. केमेकल्सवर २.७५ रू. जकात आकारणी होत आहे. महापालिकेचे कर्मचारी हे संबधीत कर्मचारी यांना महापालिका केमिकल्स वर १/-रू. प्रमाणे जकात आकारणी होत होती आपण २.७५ रू. कसे आकारणी करता. त्यावर संबधीत ठेकेदाराचे कर्मचारी यांन जे दराचा तक्ता दिला तो समोर ठेवला होता. यामूळे महापालिकेचे कर्मचारी यांनी २.७५ रूपये जकात आकारणी करण्या ऐवजी केमीकल्स वर १ रूपया प्रमाणे गेल्या वर्षभर जकात आकारणी केली यामूळे महापालिकेचे एक वर्षात जवळपास ६ कोटीचे नूकसान झालेले आहे. या बाबतीत चौकशी होणे गरजेचे आहे. एक बुकाची मी माहिती घेतलेली आहे त्याची प्रत माझ्याकडे आहे. प्रशासनास देण्यात येईल चौकशी व्हावी. व संबधीतांवर कार्यवाही करावी.

सौ. लता दलाल :काल जी बैठक झाली त्या बैठकीला मा.सचिव तसेच महाराष्ट्र शासनाचे संबधीत अधिकारी उपस्थित होते. आणि त्या अधिकाऱ्याच्या समोर ज्यांना महापालिका प्रशास नियुक्त केले असे डॉ. उनवणे यांना उत्तर देवू शकले नाही त्यामूळे या महापालिकेचा संपूर्ण महाराष्ट्रात अपमान झालेला आहे. अशा अधिकाऱ्यावर मा. आयुक्त काय कार्यवाही करणार आहे. मा. आयुक्त ही त्या बैठकीला उपस्थित होते. तरी संबधीत अधिकारी यांचेवर कार्यवाही करण्यात यावी.

मा.आयुक्त :शासनाची कमेटीचे अधिकारी येणार म्हणून दोन तीन दिवसापासून तयारी चालू होती. त्यातच मला कळाले की संबधीत अधिकारी हे सक्षमतेने काम करीत नाही त्यामूळे त्यांची बदलीची ऑर्डर दिलेली आहे. संबधीत अधिकारी उत्तर देवू शकले नाही त्यावेळी मीच म्हटले की डॉ.कुलकर्णी हे उत्तर देतील.

मा.आयुक्त :सन २००५-०६ चे सूधारीत व सन २००६-०७ चे मूळ अंदाजपत्रक प्रशासन सादर करीत आहे. त्याची परवानगी मिळावी व त्यापूर्वी मा. सभापती यांचे मी स्वागत करू इच्छितो, त्यानंतर बजेट सादर करण्यात येईल.

(याच वेळी मा. आयुक्त हे मा. सभापती यांचा स्वागत करून बजेट सादर करतात.)

प्र.मुख्यलेखाधिकारी : सर्व स्थायी समिती सदस्यांचे लेखा विभागातर्फे पुष्पगुच्छ देवून स्वागत करण्यात येते.

याच वेळी मा.आयुक्त हे मा.सभापती यांचेकडे सन २००५-०६ चा सूधारीत व सन २००६-०७ या वर्षाचा अर्थसंकल्प सादर करतात. याच वेळी मा.आयुक्त यांचे मा. सभापती तसेच स.सभासद पूष्पगूच्छ देवून

स्वागत करतात व यानंतर मा आयुक्त यांनी पावर पॉईन्ट प्रेझेंटेशन नुसार अर्थसंकल्पा विषयी माहिती सभागृहास अवगत केली.

मा.सभापती :आताच मा. आयुक्त यांनी सन २००५-०६चा सुधारीत व सन २००६-०७ चा मूळ अर्थसंकल्पा विषयी माहिती अवगत केलेली आहे. अर्थसंकल्पाच्या प्रति सर्व स्थायी समितीच्या संदस्यांना देण्यात यावेत. अर्थसंकल्पावर चर्चा करण्यासाठी येत्या १६ तारखेला बैठक घेण्यात येईल. त्यावेळी स. सदस्यांनी आपले योग्य अशा सूचना कराव्यात त्यानूसार कार्यवाही होईल.

श्री.मुजेब खान :ज्या वार्डाचे सध्या नगरसेवक नाही अशा वार्डातीलही कामे या अर्थसंकल्पात घेणे
आवशक आहे.

मा.सभापती :स.सदस्य श्री. मुजेब खान यांनी केलेल्या सूचनाची मा. आयुक्त यांनी नोंद घेवून तशी तरतूद करावी.

(दिनांक७.३.२००६ रोजे संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेतील निर्णयानुसार का. प. क्र.२७ मधील विषय क्र.२४८ व २४९)

**<u>विषय क्र.२६१ :</u>**

सन २००२-२००३ व २००३-२००४ च्या लेखा परीक्षण अहवालावर विचार विनिमय करणे.

**<u>संवाद :</u>**

श्री.रविकांत गवळी :जयकवाडी येथे बैठक घेवून तीन वर्षाच्या लेखा परीक्षण अहवालावर चर्चा केलेली आहे त्या बाबतीत खूलासा झालेला आहे आता दोन वर्षाच्या अहवालावर चर्चा होवून खूलासा घेणार आहोत. याअहवालामधे अग्निशमन दल व प्रकल्प विभागाचा अहवालच आलेला नाही.

मा.सभापती :ज्या विभागाचे अनुपालन झालेले नाही त्याचा संपूर्ण उल्लेख या अहवालात केलेला आहे. ज्या अर्थी अहवालात काही आलेले नाही त्या अर्थी त्या विभागाच्या काही त्रुटी नाही असा अर्थ होतो. तो अहवाल समोर आलेला आहे व मालमत्ता विभागाचा अहवाल आहे त्यावर जॅईटली चर्चा करावी.कमी वेळा जस्तीत जस्त मत व्यक्त करावे अशी विनंती आहे.

श्री. विनायक पांडे :लेखा परीक्षक विभागाचा जे मालमत्ता विभागाचा अहवाल आहे पान क्र ४ वरच्या प्रकरणावर मी बोलत आहे. सन ०२-०३ या वर्षात जहीर निविदा पधध्दतीचा अवलंब करण्यात येवून सय्यद उस्मान सय्यद रज्जक, सावंगी हर्सुल याची अधिक दराची म्हणजे १२,०४,५००/-इतक्या रक्कमेची निविदा प्राप्त झाली व १२,९९,५००/-इतक्या रक्कमेस मा. आयुक्तांनी प्रशासकीय मान्यता देवून प्रस्ताव स्थायी समिती समोर ठेवण्यात आल्याचे निदर्शनास आले असून प्रस्ताव स्थायी समिती समोर ठेवून अंतिम मंजूरी घेण्यात आलेली नाही. प्रशासकीय मंजूरीच्याच अधारे निविदा अट क्र ६ नुसार ठेक्याची २५ टक्के रक्कम रूपये ३.०५ लक्ष , रूपये ३.०४,८७५ ऐवजी ही पावती क्रमांक ४२८ /४२७-५७ दिनोंक ३१.३.२००२ अन्वये श्री. सय्यद उस्मान यांचेकडून वसूल करण्याचे निदर्शनास आले आहे. संबधीताकडून करारनामा करूनन घेताच ज.क्र

मनापा /६६९/०२ दिनांक ६.८.२००२ रोजी वसूलीसाठी आदेश देण्यात आलेले आहे. त्यामूळे १.४.२००२ ते ५.४.२००२ पर्यत बाजराचा ठेका वसूल करण्याचे काम कोणाकडे होते. याचा बोध यात होत नाही. तसेच कार्यादेश देण्यास विलंबाची जबाबदारी निश्चित करणे आवश्यक आहे. संबधीताकडून ८.०५ लक्ष ही रक्कम वेळोवेळी वसूल केलेली असून उर्वरीत ४.१४ लक्ष ही रक्कम अद्याप पावेतो वसूल करण्यात आलेली नाही. मालमत्ता विभागाचे अनेक प्रकरणे असे यात दिलेले आहे. गंभीर अशी प्रकरणे असून संबधीतावर कडक कार्यवाही करण्याचे आदेश देण्यात यावे अशी विंनती आहे.

श्री.शंशाक विसपूते :बाजराचा ठेका हा अत्यंत चूकीचे पध्दतीने दिलेला आहे. स्थायी समितीची मान्यता घेवून कार्यवाही झालेली होती काय .करारनामा केला त्यास स्थायी समितीची मान्यता घेतलेली होती काय सन २००३-०४ मधे जवळपास ३ लक्ष २९ हजराचे नूकसान तसेच सन ०४-०५ मधे ही ३.४४ लक्षचे नुकसान झालेले आहे. चार महिण्याची मूदत दिलेली होती. वसूली ही योग्य प्रकारे होत आहे काय? एका ठिकाणी तर असे दिले की ठेक्दार यांचा मृत्यू ४ थ्या महिन्यातझालेला असून त्याची नोंद संचिकेमधे असतांना त्यानंतरही आठ महिणे वसूली त्याचे नावाखाली होत होती.

श्री. रविकांत गवळी :सन ०२ते२००५ पर्यत आठवडी बाजराचा वसूलीचा ठेका संदर्भात ज्या ही काही निविदा काढलेल्या आहेत .त्या संदर्भात सर्व नियम धाब्याबर बसवलेले आहे. स्थायी समितीची मान्यता घेतलेली दिसून येत नाही. करारनामा केलेला नाही अटी शर्ती केलेल्या नाही. अहवालात जी ८० लक्षची वसूली बाकी दाखवलेली आहे. ती आतापर्यत वसूल केलेली आहे किंवा नाही याचा खूलासा करावा.

श्री.मुजेब खान :ज्या ठेकेदाराकडे ४.१४ लक्ष बाकी होते त्यांना पून्हा दोन वेळेस वसूलीचा ठैका देण्यात आला अगोदरचे पैसे वसूल का केलेले नाही.

श्री.शंशाक विसपूते :हा सर्व व्यवहार संघटीतपणे झालेला आहे असे दिसून येते.

मा.सभापती :स. सदस्यांनी केलेल्या सूचनाचा संबधीत मालमत्ता अधिकारी यांनी खुलासा करावा.

मालमत्ता अधिकारी : या लेखा परीक्षाच्या बाबतीत जी माहिती माझ्याकडे उपलब्ध आहे त्याची माहिती सादर करण्यात येते. मालमत्ता विभागाअतर्गत तपासणी कालावधीतील अभिलेखे अदयावत नसणे हा एक मूद्या होता त्या बध्दल संपूर्ण रजिष्टर नोंदी व पावती पूस्तके , अपूर्ण संचिका असणे , या सर्व अदयावत करण्याचे काम हाती घेतलेले आहे. आणि लेखा परीक्षणाकरीता मागिल पूस्तके व इतर कागदपत्र उपलब्ध करून दिले होते. जुन्या काही संचिका मिळतच नाही त्या बाबतीत सुध्दा जूने काही रेकॉर्ड बघून जेजूने कपाट आहे व त्यात ज्या जून्या संचिका आहे त्याची यादी तयार करण्याचे काम सूरू केलेले आहे. जेणे करून ज्या संचिका मिळत नाही त्याही प्राप्त होतील. आठवडी बाजर संदर्भात विविध ठेकेदाराकडून अनुक्रमे रक्कम ३.४४ लक्ष एवढी रक्कम तसेच १८.२९ व रूपये १०.११ लक्ष एवढी रक्कम अशी एकूण ३१.८५ लक्ष रक्कम वसूल करण्या बाबत लेखा परीक्षणामधे अक्षेप घेण्यात आला होता. त्याप्रमाणे आम्ही संपूर्ण बाजरच्या संचिका, पावती पुस्तके तसेच मागणी रजिष्टर व न वटलेले धनादेश ई. ची

तपासणी केली असता चिकलठाणा बाजरच्या ठैक्ेदाराकडून ४,७४,०६७/- रूपये येणे आहे. तर जफरगेट बाजराचे १८.२९ पैकी ९.०४ लक्ष येणे आहे ते वसूल करायचे आहे. पिरबाजरचे ११.८५ लक्ष वसूल करायचे आहे. या संपूर्ण ठैकेदारास मालमत्ता जप्तीच्या सुचना दिलेल्या आहेत. एक ठेकेदार मयत असतांना ही त्याचेकडून ठैका वसूलीचे काम करून घेतले जत होते. या संदभृत तत्कालीन मालमत्ता अधिकारी यांना पत्र देवून खूलासा मागविलेला आहे. काही कालावधीत ठेका कोणाकडून वसूल केला याचा खूलासा संबधीत तत्तकालीन मालमत्ता अधिकारी यांचेकडून घेणे योग्य होईल.

सौ. लता दलाल :आम्ही अमूक करीत आहे अमूक करणार आहोत असे उत्तर देणे बरोबर नाही. मयत ठेकेदारास ठेका दिला होता. माहिती मागविललेली आहे. असे उत्तर दिले परंतू जे तत्कालीन मालमत्ता अधिकारी होते ते याच मनपाच्या सेवेत आहे उत्तर घेण्यास उशीर होणे बरोबर नाही. उडवा उडवीची उत्तरे देवू नये. लाखो रूपयाचा भष्टाचार होतो. लोखो रूपये येणे आहे. वसूली झालेली नाही.या पूर्वीही मालमत्ता विभागावर चर्चा झालेली होती. संबधीतावर काय कार्यवाही केलेली आहे हे उत्तर अपेक्षीत आहे. प्रशासनाने संबधीत अधिकारी कर्मचारी यांचेवर काय कार्यवाही केलेली आहे याचा खूलासा करावा. कारण अहवाल येवून सूध्दा बरेच दिवस झालेले आहे. बाजरच्या ठेका संदर्भात जर ३० लक्षची वसूली असेल तर इतर महापालिकेच्या मालमत्ता विषयी वसूली संदर्भात माहिती घेतली तर वेळ पूरता होणार नाही.

मा.सभापती :मालमत्ता विभागाची जी प्रशासनामार्फत चौकशी केलेली होती त्या चौकशीचा अहवाल आलेला आहे. तो सभागृहात देण्यात यावा.

उपआयुक्त(प्रशासन) : मालमत्ता बाबतचा जे अहवाल आहे तो प्राथमिक चौकशीचा आहे. त्या नुसारच विभागीय चौकशी ला सुरूवात केलेली असून निवृत्त न्यायाधिशा श्री.निरखी साहेब यांचेकडे दिलेला आहे. यामधे चौकशी अधिकारी तसेच सादर कर्ता अधिकारी यांची नेमणूक झालेली आहे. आणि त्या कार्यवाहीचा रिपोर्ट अद्याप प्राप्त झालेला नाही. सहा महिन्याची मूदत दिलेली होती. तीन चार महिन्यापूर्वी दिलेली आहे. विभागीय चौकशी अहवाल प्राप्त झाल्यानंतर कार्यवाही करण्यात येईल.

श्री. शंशाक विसपूते :जे काही खूलासा आताच मालमत्ता अधिकारी यांनी केला चुकीची आकडेवारी सांगितलेली आहे. चिकलठाणा बाजर प्रकरणात दोन तीन वर्षात एकूण ३४ लक्ष रक्कम बुडीत झालेली असून एकूण सर्वच बाजरच्या बाबतीत कमीत कमी ८० लक्ष रक्कम महानगरपालिकेची बुडीत झालेली आहे.

श्री. मुजीब खान :जे प्रश्न स. सदस्यांनी मांडलेला आहे त्याचा खुलासा झालेला नाही. जे ११ लक्ष ४ लक्ष ३ लक्ष रू. बाकी आहे किती वर्षाचे आहे. वसुलीची रक्कम बाकी असतांना पून्हा ठेका त्याच ठेकेदारास दिलेला आहे का याचा खूलासा झालेला नाही.।कोणत्या वर्षाचे किती रक्कम बाकी आहे. तसेच रक्क्म बाकी असतांना पुर्वीच्याच ठेकेदारास ठैका देण्याची गरजकाय होती याचा खूलासा करावा. माझ्या माहिती प्रमाणे सन ०२-०३ चे रक्कम बाकी असतांना पून्हा ०३-०४ साठी त्याच ठेकेदारास ठेका दिला गेला . संबधीत ठेकेदाराकडे बाकी होती तर पून्हा

पून्हा ठैका देण्याची गरज काय होती. कोणत्या वर्षाचा ठैका कुणास दिला याचा खूलासा करावा.

मा.सभापती :मालमत्ता विभागाचा जे लेखा परीक्षणाचा अहवाल आलेला आहे त्यात स्पष्ट असे दिले की दोन तीन वर्षापासून काही ठेकेदाराकडून थकबाकी अद्याप वसूल झालेली नाही. संबधीत जे विभाग प्रमुख होते त्यांची ती जबाबदारी होती. ती त्यांनी पार पाडलेली नाही. त्यामूळे त्याचे वर आक्षेप स्पषट होतो. तसेच करारनामा करीत असतांना मुदत संपल्यानंतर मुदतवाढ न घेता केलेले आहे. ती ही नियमबाह्य आहे असे निदर्शनास येत आहे. ज्या वेळेस एखाद्या एज्न्सीला काम देण्यात येते त्या बाबतीत स्थायी समितीकडे प्रकरण येणे आवशक असते. नियमास अनुसरून आहे. त्या नियमाचे उल्लंघन केलेले आहे. प्रशासनाला स्पष्ट सूचना देण्यात येत आहे की. प्रशासनातील काही अधिकारी हे कर्तव्यापासून दूर जत आहे व त्यांना पाठीशी घालण्याचा प्रशासनाचा खटाटोप दिसून येतो. त्यामुळे या प्रकरणात जे जे कुणी दोषी असतील त्याचंवर प्रशासनाने त्वरीत कार्यवाही करावी, नंतर चौकशी करावी. यास जे स. सदस्य सहमत आहात त्यांनी हात वर करावे व प्रशासनाने या संबधी त्वरीत अंमलबजवणी करावी. (याच वेळी सर्व उपस्थित स. सदस्य हात वर करतात.)

या संदर्भात जे अनुपालन अहवाल द्यावयाचा बाकी आहे तो तीन दिवसात लेखा परीक्षण विभागास देण्यात यावा. अनुपालन अहवाल दिला नाही तर आक्षेप मान्य आहे. यात अडचण येण्याचा प्रश्न येत नाही. विभाग प्रमुख सक्षम आहेत. मुख्य लेखा परिक्षक यांचेकडे ३ दिवसांत अनुपालन करावे.

**ठराव :**

सन २००२-२००३ व २००३-२००४ या आर्थिक वर्षातील एकत्रित लेखा परीक्षण अहवालावर सभागृहात सांगोपांग चर्चा होऊन असा निर्णय घेण्यात आला की, संबंधीत शाखा प्रमुखांनी, विभाग प्रमुखांमार्फत त्यांचे विभागाशी संबंधीत प्रलंबीत असलेल्या परिच्छेदासंबंधीचा परिच्छेद निहाय दुरूस्त्यासह अनुपालन अहवाल मुख्य लेखापरिक्षकांकडे सादर करावेत. या सुचना व दुरूस्त्यांसह सन २००२-२००३ व २००३-२००४ च्या लेखा परीक्षण अहवालास सर्वानुमते मंजुरी देण्यात येऊन सर्वसाधारण सभेकडे सादर करण्यास शिफारस करण्यात येते.

**विषय क्र.२६२ :**

सन २००२-०३ ते सन २००४-०५ या आर्थिक वर्षातील मालमत्ता विभागाचे लेखा परीक्षण अहवालावर विचार विनिमय करणे.

**ठराव :**

या संदर्भात जे अनुपालन अहवाल द्यावयाचा बाकी आहे तो तीन दिवसात लेखा परीक्षण विभागास अनुपालन अहवाल सादर करावा. या प्रकरणात जेजेकुणी दोषी असतील त्याचंवर प्रशासनाने कार्यवाही करावी, नंतर चौकशी करावी व प्रशासनाने या बाबतीत त्वरीत अंमलबजवणी करावी, असे सर्वानुमते ठरले. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**संवाद :**

सौ. लता दलाल :दोन दिवसापासून बातमी येत आहे की ज्या ठिकाणी अनधिकृत नळ कनेक्शन असतील किंवा पाणीपट्टी भरणा केलेली नसेल अशा एक किंवा दोन थकबाकीदाराच्यासाठी सामुदायिक सगळयांच्यावर दंड आकारण्यात येईल. असे दिले परंतू ही पध्दत चूकीची आहे. याचा अर्थ अधिकारी वसूली करण्यास सक्षम

नाही असा होतो. माझी अशी सूचना आहे जेथे अनधिकृत नळ कनेक्शन असतील अशा नळधारकांकडून स्पॉटवर नळ कनेक्शन देवून टाकावे पैसे भरून घ्यावेत. ज्यांचेकडे पाच ते दहा वर्षाची थकबाकी असेल त्यांचेकडून अर्धी रक्कम भरून घ्यावी . सामुदायिक दंड आकारणी करणे हे योग्य नाही.

मा.सभापती :स. सदस्याची जी सूचना आहे . संबधीत अधिकारी यांना सूचना की अभय योजनेला मंजूरी दिलेली आहे. अनधिकृत नळ कनेक्शन आहे. त्यांचेसाठी अभय योजनेनूसार कार्यवाही करावी. ज्यांचे अनधिकृत नळ कनेक्शन आहे ते रेग्यूलाईज करण्यास संधी देवूनही तयार नसतील तर बंद करण्यात यावे. जे पैसे देण्यास तयार नाही त्याचेकडून वसूली करण्याची कार्यवाही करावी. सामुहित कार्यवाही करून नळ कनेक्शन बंद करू नये.

**<u>ऐनवेळचे विषय</u>**

मा. सभापती : ऐनवेळचे विषय मंजूर करण्यात येतात.

**<u>विषय क्र.२६३ :</u>**

कार्यकारी अभियंता (ड्रेविइवउबां) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, जुनाबाजर येथील आरक्षण क्र.६२ येथे उद्यान विकसीत करण्याच्या कामाचे अंदाजपत्रक सा.बां.विभागाच्या सन २००४-२००५ च्या जिल्हा दरसुची नुसार र.रू.४९,९७,०६०/- चे तयार करण्यात आले असून त्यास मा.सर्वसाधारण सभेने दि.२०.१०.२००५ रोजी संपन्न झालेल्या सभेत विषय क्र.१६१/७ अन्वये मान्यता दिलेली आहे.

त्यानुसार कार्यालयीन निविदा सूचना ज.क्र.मनपा/लेखा/नि/९१/०६ दि.३१.१.२००६ अन्वये निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण १५ निविदा विक्री झाल्या व निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण ५ निविदा दर भरून प्राप्त झाल्या. त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| १. सुंदर कन्स्ट्रक्शन | २१.५% कमी दराने |
| २. अमन असोसिएटस् | १८.२१% कमी दराने |
| ३. एल.के.कन्स्ट्रक्शन | १६.७८६% कमी दराने |
| ४. शहा कन्स्ट्रक्शन | १४.९९% कमी दराने |
| ५. मे.महिमा कन्स्ट्रक्शन | १२.०५% कमी दराने |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराने म्हणजेच अं.प.दरापेक्षा २१.५% कमी दराची निविदा सुंदर कन्स्ट्रक्शन यांची प्राप्त झालेली आहे. त्यास मा.आयुक्तांनी मान्यता दिलेली आहे. तरी सुंदर कन्स्ट्रक्शन यांची अं.प.दरापेक्षा २१.५% कमी दराची निविदा मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे जुनाबाजर येथील आरक्षण क्र.६२ येथे उद्यान विकसीत करण्याच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं.प.दरापेक्षा २१.५% कमी दराची सुंदर कन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारणेस मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र.२६४ :</u>**

कार्यकारी अभियंता (ड्रेविइवउबां) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, प्रशासकीय इमारत टप्पा क्र.३ अंतर्गत भांडार विभागासाठी उर्वरीत कामे करणेस्तव सा.बां.विभागाच्या सन २००४-०५ च्या जिल्हा दरसुचीनुसार र.रू.१,०३,७२४/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून कामाची तातडी पाहता उपलब्ध ठेकेदार मे.एल.के.कन्स्ट्रक्शन यांचेकडून काम करून घेण्यात आलेले आहे. सदरील

कार्योत्तर अंदाजपत्रकास मा.आयुक्तांनी मान्यता दिलेली आहे. त्यानुसार र.रू.१,०३,७२४/- चे अंदाजपत्रकास कार्योत्तर मान्यतेचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रशासकीय इमारत टप्पा क्र.३ अंतर्गत भांडार विभागासाठी उर्वरीत कामे करण्यासाठी तयार केलेले र.रू.१,०३,७२४/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदरचे काम उपलब्ध ठेकेदार मे.एल.के.कन्स्ट्रक्शन यांचेकडून करून घेण्यात आलेल्या कामास कार्योत्तर मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२६५ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, शहरातील मंजूर रेखांकीत विविध प्रभागातील ५१ संरक्षित जगेवर ३००० वृक्षांची लागवड करण्यात आली असून त्याचे तीन वर्षाकरीता वृक्षसंवर्धन व जतन, जगेची साफसफाई देखभाल करणे इ. कामाकरीता रू.१४.३४ लक्षचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. तीन वर्ष देखभाल केल्यानंतर जीवंत झाडांच्या संख्येनुसार अंतिम देयक देण्यात येईल. करीता प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शहरातील मंजूर रेखांकीत विविध प्रभागातील ५१ संरक्षित जगेवर लागवड केलेल्या वृक्षांची तीन वर्षाकरीता वृक्षसंवर्धन व जतन, जगेची साफसफाई देखभाल करणे इ. कामाकरीता तयार करण्यात आलेल्या र.रू.१४.३४ लक्ष च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२६६ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.३५ अंतर्गत मो.गरमपानी येथील नाल्यालगत दगडी संरक्षित भिंत बांधणेच्या कामासाठी अर्थसंकल्प पुस्तिका २००५-०६ मध्ये पान क्र.१८७ वर अनुक्रमांक ३ व १० नुसार एकूण रक्कम रू.१५ लक्ष उपलब्ध करून देण्यात आली आहे. त्यानुसार अंदाजपत्रक र.रू.१४,८८,०००/- चे सन २००४-०५ च्या दरसूचीप्रमाणे तयार केले आहे. या अंदाजपत्रकास मा.स्थायी समिती सभा दि.७.२.२००६ विषय क्र.२१५ अन्वये मंजुरी प्राप्त आहे.

उपरोक्त काम हाती घेण्यापुर्वी प्रत्यक्ष स्थळी पात्राची रूंदी, नगर रचना विभागाकडून सिमांकित करून घेवून प्रवाहास बाधीत अतिक्रमणे काढून घेणे व नंतर काम करणे या अटीवर मान्यता प्राप्त आहे. त्या अनुषंगाने उपरोक्त कामासाठी बी-१ निविदा सूचना प्रसिध्दीस दिली असता दि.१६.२.२००६ पर्यंत १३ कोऱ्या निविदांची विक्री झाली व निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत म्हणजेच २३.२.०६ पर्यंत एकूण चार दर भरलेल्या निविदा प्राप्त झाल्या. त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

१. श्री.एस.एम.इब्राहिम ०.१% कमी दराने
२. मे.एल.के.कन्स्ट्रक्शन १.१०% जस्त दराने
३. श्री.सिद्यीकी मो.लईक २.५०% जस्त दराने
४. मे. अलीफ असोसिएटस् ३.५०% जस्त दराने

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजेच अं.प.दरापेक्षा ०.१०% कमी दराची निविदा श्री.एस.एम.इब्राहिम कंत्राटदार औरंगाबाद यांची आहे. त्यास दि.४.३.२००६ रोजी मा.आयुक्तांची मान्यता प्राप्त आहे. तरी ०.१% कमी दराची निविदा मंजुरीच्या विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.३५ अंतर्गत मो.गरमपानी येथील नाल्यालगत दगडी संरक्षित भिंत बांधणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं.प.दरापेक्षा ०.१०% कमी दराची श्री.एस.एम.इब्राहीम यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

सदरील काम हाती घेण्यापुर्वी प्रत्यक्ष स्थळी पात्राची रूंदी नगर रचना विभागाकडून सिमांकित करून घेवून प्रवाहास बाधीत अतिक्रमणे काढून घेतल्यानंतरच काम हाती घेण्यात यावे. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२६७ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे की, मील कॉर्नर खडकेश्वर ते औरंगपुरा महात्मा फुले पुतळ्यापर्यंतच्या रस्त्यावर फुटपाथ बांधणेच्या कामाचे अंदाजपत्रक रू.१५,३५,४२५/- चे असून या कामासाठी निविदा मागविण्यात आल्या असता एकूण ५ भरलेली निविदापत्रके प्राप्त झाली. सदर निविदांचे दर खालील प्रमाणे आहेत.

| | |
|---|---|
| १. मे.आदीनाथ कन्स्ट्रक्शन | ३३.६४% कमी दराने |
| २. शहा कन्स्ट्रक्शन | २७.८९% कमी दराने |
| ३. अमन असोसिएटस् | २७.२९% कमी दराने |
| ४. हेमंत गंगवाल | २५.००% कमी दराने |
| ५. आर.बी.रूडसमुद्र | २३.००% कमी दराने |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराची निविदा मे.आदीनाथ कन्स्ट्रक्शन यांची असून ती अं.प.दरापेक्षा ३३.६४% कमी दराची आहे. मा.आयुक्तांनी ५% सुरक्षा अनामत घेणेच्या अटीवर सदर कामाच्या निविदेची शिफारस केली आहे. तरी मे.आदीनाथ कन्स्ट्रक्शन यांची निविदा मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मील कॉर्नर खडकेश्वर ते औरंगपुरा महात्मा फुले पुतळ्यापर्यंतच्या रस्त्यावर फुटपाथ बांधणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारक मे.आदीनाथ कन्स्ट्रक्शन यांची अं.प.दरापेक्षा ३३.६४% कमी दराची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२६८ :**

शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहे की, महानगरपालिका शाळा व विभागीय मनपा कार्यालयातील नादुरूस्त फर्निचर दुरूस्त करणेच्या र.रू.१४,६१,९८७/- च्या कामाची बी-१ नमुन्या निविदा सूचना क्र.मनपा/भांडार/२००४/३९४ दि.२५.१०.२००४ अन्वये निविदा मागविण्यात येवून सर्वात कमी म्हणजेअं.प.दरापेक्षा २९.१०% कमी दराची मे.नॅशनल फॅब्रीकेटर्स अँड ट्रेडर्स यांची निविदा प्राप्त झाल्यानुसार मा.आयुक्तांचे दि.११.१.२००५ च्या मंजुरीनुसार निविदेस मा.स्थायी समितीने दि.२७.१.२००५ अन्वये दिलेल्या मंजुरीनुसार मे.नॅशनल फॅब्रीकेटर्स अँड ट्रेडर्स यांचेकडून सदर काम पूर्ण करून घेण्यात आलेले असून पूर्ण कामावर र.रू.१४,७०,३५१/- खर्च झालेला आहे.

सदर निविदा दर अं.प.दरापेक्षा २९.१०% कमी दराने असल्याने कामामध्ये र.रू.४,१९,५०८/- ची बचत झालेली आहे. दरम्यानच्या कालावधीमध्ये शाळा व विभागीय कार्यालयातील नादुरूस्त फर्निचर दुरूस्तीच्या कामामध्ये व विविध वाचनालयातील फर्निचर दुरूस्तीच्या कामामध्ये वाढ झाल्यानुसार वाढीव कामाचे दुरूस्त अंदाजपत्रक र.रू.३,४७,३६०/- चे तयार करण्यात आले असून सदर खर्च कामाच्या झालेल्या बचतीमधून करण्यात येणार असून सदर काम मुळ कामाचे गुत्तेदार मे. नॅशनल फॅब्रीकेटर्स अँड ट्रेडर्स यांच्याकडून मुळ निविदा दराने म्हणजेच अं.प.दरापेक्षा २९.१०% कमी दराने करून घेण्यात येणार आहे. त्यास मा.आयुक्तांनी दि.१.३.२००६ अन्वये मान्यता दिलेली आहे.

करीता मनपा शाळा व विभागीय कार्यालयातील फर्निचर दुरूस्त करणेच्या वाढीव कामाचे रक्कम रू.३,४७,३६०/- चे अंदाजपत्रकास व सदर काम कामाचे मुळ गुत्तेदार मे.नॅशनल फॅब्रीकेटर्स

अँड ट्रेडर्स यांचेकडून अं.प.दरापेक्षा २९.१०% कमी दराने करून घेण्याचा प्रस्ताव मा.स्थायी समितीसमोर मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मनपा शाळा व विभागीय कार्यालयातील फर्निचर दुरूस्त करणेच्या वाढीव कामाचे रक्कम रू.३,४७,३६०/- चे अंदाजपत्रकास व सदर काम कामाचे मुळ गुत्तेदार मे.नॅशनल फॅब्रीकेटर्स अँड ट्रेडर्स यांचेकडून अं.प.दरापेक्षा २९.१०% कमी दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वेधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२६९ :**

कार्यकारी अभियंता (ड्रेविइवउबां.) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की हॉटेल अमरप्रित (जलना रोड) ते बीड बायपास रोडवरील पथदिव्यांचे पोल स्थलांतरीत करणेच्या कामाकरीता सा.बां.विभागाच्या सन २००४-०५ च्या जिल्हा दरसुची नुसार र.रू.३२,००,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून त्यास सर्वसाधारण सभा दि.७.७.२००५ विय क्र.४० अन्वये मान्यता प्राप्त झाली आहे. सदरील कामासाठी वर्तमानपत्रात जहिरात देवून निविदा (दुसरी वेळ) मागविली असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण ५ निविदा विक्री झाल्या. निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेस एकूण चार निविदा प्राप्त झाल्या. प्राप्त निविदेतील भरलेले दर खालील प्रमाणे आहेत.

| | |
|---|---|
| १. मे.लुना इलेक्ट्रीकल्स | अं.प.दरापेक्षा ३.३% कमी दराने |
| २. मे.असान्सो लाईटस् | अं.प.दरापेक्षा १% जस्त दराने |
| ३. मे.कैपको एजन्सीज | अं.प.दरापेक्षा ७.२०% जस्त दराने |
| ४. मे.रेणुका इलेक्ट्रीकल्स् | अं.प.दरापेक्षा ८% जस्त दराने |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजेच अं.प.दरापेक्षा ३.३% कमी दराची मे.लुना इलेक्ट्रीकल्स यांची निविदा आहे. सदरील निविदाधाराकास मा.आयुक्तांनी दर वाटाघाटीसाठी बोलविले असता सदरील काम अं.प.दरापेक्षा ४.३०% कमी दराने करण्यास गुत्तेदाराने मान्य केले आहे. करीता सदरील कामाची निविदा स्विकृतीचा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**संवाद:**

मा. सभापती :या प्रस्तावाच्या संदर्भात चिकलठाणा ते कॅब्रीज हायस्कूल पर्यत जी महापालिकेची हद्य आहे. तिथपर्यत अनेक वर्षापासूनचे पथदिव्याचे काम करणे बाकी आहे. ते त्वरीत करण्याच्या सूचना देण्यात येत आहे. पोल लावण्याची कार्यवाही करावी या प्रस्तावास मान्यता देण्यात येते.

श्री. मुजेब खान :सहा महिण्यापासून सूचना करतो आहे वार्डात लाईटचे काम होत नाही. लाईटसाठी तरतूद नव्हती आता आहे. तरीही काम होत नाही. याचे कारण काय खूलासा करावा.

मा.सभापती :संबधीत अधिकारी यांना सूचना करण्यात येते की बीओटी पध्दतीने जे पाच हजर पोलचे काम करणार आहोत. एजन्सीला जे जस्त कालावधी दिलेला आहे तो कमी करावा व काम तात्काळ करण्याच्या दृष्टीने कार्यवाही करावी.त्या संबधीचा प्रस्ताव तात्काळ स्थायी समितीच्या मंजुरीसाठी सादर करावा. विदयूत विभागासाठी जी ४० लक्षची तरतूद केलेली आहे. त्यातून त्वरीत वार्डात दिवे लावण्याची व्यवस्था करावी.या प्रस्तावास मान्यता देण्यात येते. बजेट बुक सर्वांना देण्याचे यावे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे हॉटेल अमरप्रित (जलना रोड) ते बीड बायपास रोडवरील पथदिव्यांचे पोल स्थलांतरीत करणेच्या कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारकाशी झालेल्या वाटाघाटीअंती ठरल्यानुसार सदरील काम मे.लुना इलेक्ट्रीकल्स यांचेकडून अं.प.दरापेक्षा ४.३०% कमी दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२७० :**

कार्यकारी अभियंता (ड्रेविइवउबां) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, संत एकनाथ रंगमंदिराचे आधुनिकीकरण करण्याच्या कामाचे अंदाजपत्रक सा.बां.विभागाच्या सन २००४-०५ च्या जिल्हा दरसुची नुसार र.रू.१६,६७,०००/- चे तयार करण्यात आले असून त्यास मा.आयुक्तांनी दि.३.१.२००६ अन्वये मंजुरी दिलेली आहे. तसेच स्थायी समितीने विषय क्र.१७५ दि.१०.१.२००६ अन्वये मान्यता दिलेली आहे.

त्यानुसार सदरील कामास्तव कार्यालयीन निविदा सूचना ज.क्र.मनपा/लेखा/नि/९३/०६ दि.४.२.०६ अन्वये निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण १० निविदा विक्री णाल्या व निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण ५ निविदा दर भरून प्राप्त झाल्या. त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| १. एल.के.कन्स्ट्रक्शन | १% जस्त दराने |
| २. शहा कन्स्ट्रक्शन | ५% जस्त दराने |
| ३. रमेश बी रूडसमुद्र | ११.११% जस्त दराने |
| ४. एस.एम.इब्राहीम | अंदाजपत्रकीय दराने |
| ५. मो.सोहेल सिद्दीकी | २.५ जस्त दराने |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराची म्हणजेच अंदाजपत्रकीय दराची निविदा मे.एस.एम.इब्राहीम यांची प्राप्त झालेली आहे. त्यास मा.आयुक्तांनी मान्यता दिलेली आहे. त्यानुसार एस.एम.इब्राहीम यांची अंदाजपत्रकीय दराची निविदा स्विकृतीचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे संत एकनाथ रंगमंदिराचे आधुनिकीकरण करण्याच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दराची एस.एम.इब्राहीम यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२७१ :**

कार्यकारी अभियंता (ड्रेविइवउबां) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, जलाननगर येथील उद्यानात जिम्नॅशियम हॉल बांधणेच्या कामाचे अंदाजपत्रक सा.बां.विभागाच्यासन २००४-०५ च्या जिल्हा दरसुचीनुसार रक्कम रू.१२,००,०००/- चे तयार करण्यात आले असून त्यास मा.आयुक्त महोदय यांनी प्रशासकीय मंजुरी दिलेली आहे. त्यास मा.स्थायी समितीने दि.२४.१.२००६ रोजी संपन्न झालेल्या सभेत मान्यता दिलेली आहे.

त्यानुसार सदरील कामासाठी कार्यालयीन निविदा सूचना ज.क्र.मनपा/लेखा/नि/९१/०६ दि.३१.१.२००६ अन्वये निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण १३ निविदा विक्री झाल्या व निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण ५ निविदा दर भरून प्राप्त झाल्या. त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| १. एल.के.कन्स्ट्रक्शन | ४.९९% जस्त दराने |
| २. गोविंद एस.डाबरीवाल | ७% जस्त दराने |
| ३. शहा कन्स्ट्रक्शन | १०% जस्त दराने |

| | |
|---|---|
| ४. एस.एम.इब्राहीम | ७.४९% जस्त दराने |
| ५. जयलक्ष्मी कन्स्ट्रक्शन | १% इसारा रक्कम कमी असल्याने निविदा उघडण्यात आली नाही. |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं.प.दरापेक्षा ४.९९% जस्त दराची निविदा एल.के.कन्स्ट्रक्शन यांची प्राप्त झालेली आहे. तथापी निविदा धारकास दराच्या वाटाघाटीस्तव बोलविले असता सदरील निविदा अंदाजपत्रकीय दराने करण्यास मा.आयुक्तांनी मान्यता दिलेली आहे.

त्यानुसार एल.के.कन्स्ट्रक्शन यांची अंदाजपत्रकीय दराची निविदा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे जलाननगर येथील उद्यानात जिम्नॅशियम हॉल बांधणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारकाशी झालेल्या वाटाघाटीअंती ठरल्यानुसार सदरील काम मे.एल.के.कन्स्ट्रक्शन यांचेकडून अंदाजपत्रकीय दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२७२ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे की, वरद गणेश मंदिर ते सावरकर चौक पर्यंतच्या रस्त्यास फुटपाथ पेव्हींग ब्लॉक्स् बसविणेच्या कामाचे अंदाजपत्रक र.रू.१०,८१,४३०/- चे असून या कामाची निविदा मागविण्यात आल्या असता, एकूण पाच भरलेली निविदापत्रके प्राप्त झाली. सदर निविदांचे दर खालील प्रमाणे आहेत.

| | |
|---|---|
| १. मे.आदीनाथ कन्स्ट्रक्शन | ३५.५% कमी दराने |
| २. आर.एम.आनंद | ३२.०८% कमी दराने |
| ३. उत्तम पंडीत | २८.९९% कमी दराने |
| ४. राहुल आर.दाशरथे | २४.३% कमी दराने |
| ५. आर.बी.रूडसमुद्र | २३% कमी दराने |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराची निविदा मे.आदीनाथ कन्स्ट्रक्शन यांची असून ती अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३५.५% कमी दराने आहे. मा.आयुक्तांनी ५% सुरक्षा अनामत घेणेच्या अटीवर सदर कामाच्या निविदेची शिफारस केली आहे.

तरी मे.आदीनाथ कन्स्ट्रक्शन यांची निविदा मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वरद गणेश मंदिर ते सावरकर चौक पर्यंतच्या रस्त्यास फुटपाथ पेव्हींग ब्लॉक्स् बसविणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराची व अं.प.दरापेक्षा ३५.५% कमी दराची मे.आदीनाथ कन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२७३ :**

कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा विभाग, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर कला आहे की, औरंगाबाद पाणी पुरवठा योजनेच्या नवीन फारोळा पंपगृह येथील ६७० अश्वशक्ती व्ही.टी.पंपासाठी सुट्या भागाचा पुरवठा करण्यासाठीच्या रूपये १९,९९,६५५/- च्या अंदाजपत्रकास मा.स्थायी समितीने ठराव क्र.१३६ दि.१५.१२.२००५ अन्वये मान्यता दिलेली आहे.

या कामासाठी वर्तमानपत्रात प्रसिध्दी देऊन निविदा सुचना क्र.मनपा/लेखा/नि/८५/०६ दिनांक १८.१.२००६ अन्वये स्पधात्मक निविदा मागविण्यात आल्या. त्यानुसार निविदा विक्रीच्या शेवटच्या दिनांकापर्यंत एकूण पाच निविदा विक्री झाल्या व निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेस चार दर भरलेल्या सिलबंद निविदा प्राप्त झाल्या. त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| १. मे.अमीत इंजिनिअर्स, औरंगाबाद | १४.८५% जस्त दराने |
| २. मे.एस.जे.एल.इंजि,नागपूर | १७% जस्त दराने |

३. मे.लक्ष्मी सिव्हील इंजिनिअरींग सर्व्हीसेस, कोल्हापूर    १९% जस्त दराने
४. मे.भारत इंजिनिअरींग, औरंगाबाद    २०% जस्त दराने

वरील प्राप्त दराची तुलना केली असता मे.अमित इंजिनिअर्स, औरंगाबाद यांचे दर सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा १४.८५% जस्त दराने आहेत. सदरच्या दराबाबत वाटाघाटी केल्यानंतर १३% जस्त दराच्या निविदेस मान्यतेस्तव मा.आयुक्त यांनी शिफारस केली आहे.

सदरील जस्त दराबाबत खुलासा करण्यात येतो की, या कामासाठीचे अंदाजपत्रक पंपाचे उत्पादकाचे दरपत्रक दि.४.८.२००५ व ३०.८.२००५ नुसार तयार करण्यात आले व याच दराने निविदा मागविण्यात आल्या ते दर ३० दिवसांपर्यंत बंधनकारक होते. त्यानंतर सुट्या भागाचे दर १.१.२००६ पासून १५% वाढल्याबाबत पंपाच्या उत्पादकाने कळविले आहे.

या कारणामुळे व सुट्या भागाची निकड लक्षात घेता १३% जस्त दराची मे.अमित इंजिनिअर्स, औरंगाबाद यांची निविदा मा.स्थायी समिती समोर विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद पाणी पुरवठा योजनेच्या नवीन फारोळा पंपगृह येथील ६७० अश्वशक्ती व्ही.टी.पंपासाठी सुट्या भागाचा पुरवठा करण्यासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारकाशी झालेल्या वाटाघाटीअंती ठरल्यानुसार मे. अमित इंजिनिअर्स, औरंगाबाद यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा १३% जस्त दराची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२७४ :**

कार्यकारी अभियंता (ड्रेनेज, विद्युत, इमारती, उद्याने) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मुख्य कार्यालय इमारतीत मा.महापौर दालन, सर्व स.पदाधिकाऱ्यांची दालने, मा.आयुक्त दालन, निवडणूक विभाग, शहर अभियंता यांचे कार्यालय, आस्थापना-१ विभाग, विधी विभाग, नगर सचिव विभाग इ. विभागात लोड शेडींगमुळे कामात अडथळे येत असल्यामुळे या विभागामध्ये तातडीने एकूण १५ नग खछत्तएठढज्ञ(इन्व्हरटर) बसविण्यासाठी एकत्रित रू.५,४३,७५०/- चे अंदाजपत्रक तयार करून प्रस्ताव सादर करण्यात आला. सदरील काम विना निविदा करावयाचे असल्यामुळे सदरील कामासाठी कोटेशन मागविण्यात आले. प्राप्त कोटेशनचे दर खालील प्रमाणे आहेत.

| अ. क्र. | विवरण | एजन्सीचे नांव | | |
|---|---|---|---|---|
| | | रूद्रा एंटरप्राईजेस | एक्सेल कॉर्पोरेशन | जनकी डिस्ट्रीब्युटर |
| १ | Invertor १४०० VA/२४V | १४३००/- | १५३००/- | १४८००/- |
| २ | १५० AH BATTERY | ७८००द२=१५६०० | ८४००द२=१६८०० | ८०००द२=१६००० |
| ३ | DOUBLE TROLLY | ५०००/- | ५७५०/- | ५४००/- |
| ४ | INSTALLATION CHARGE | १३५०/- | १८६०/- | १५००/- |
| | Total.. | ३६२५०/- | ३९७१०/- | ३७७००/- |

प्राप्त कोटेशनचे दर पाहता सर्वात कमी दराचे कोटेशन रू.३६२५०/- चे रूद्रा एंटरप्रायजेस यांचे आहे. त्यानुसार रूद्रा एंटरप्रायजेस यांच्या मार्फत सर्वात कमी दरानुसार म्हणजेच रू.३६२५०/- प्रति नग दराने इन्व्हरटर (खीींशीीींी) बसविण्याचे काम हाती घ्यावयाचे आहे. विना निविदा काम करून घ्यावयाचे झाल्यास हे अधिकार मा.स्थायी समितीचे असल्याने, मा.स्थायी समितीची पूर्वमान्यता आवश्यक आहे. तरी प्रस्तावास मान्यता झाल्यास सदरचे काम विना निविदा उपलब्ध ठेकेदार/एजन्सी मे.रूद्रा एन्टरप्रायजेस यांचेकडून अंदाजपत्रकीय दराने तातडीने करून घेण्यात येईल.

सदर कामासाठी 'विद्युत साहित्य खरेदी' या लेखाशिर्षकाखाली सध्या तरतुद शिल्लक नसल्यामुळे मा.सभापती, स्थायी समिती यांचेशी झालेल्या चर्चेनुसार त्यांचा वॉर्ड क्र.२६ मध्ये अर्थसंकल्प पुस्तिका पृष्ठ क्र.१३४ वर अ.क्र.१५ वरील 'एन-९ प्रतापगडनगर खुली जगा विकसीत करणे व हॉल बांधणे' या कामासाठी र.रू.७.०० लक्षची तरतूद करण्यात आलेली आहे. सदर काम या आर्थिक वर्षात होऊ शकत नसल्याने या कामासाठी असलेल्या रू.७.०० लक्ष मधून १.५० लक्ष यापुर्वीच वळती करण्यात आलेले असून उर्वरीत रू.५.५० लक्षची आर्थिक तरतुद 'विद्युत साहित्य खरेदी' या लेखा शिर्षकाखाली वळविण्यात यावी आणि इन्व्हर्टर बसविण्याचे र.रू.५,४३,७५०/- चे कामाचा खर्च त्यातून भागविण्यात यावा असे ठरले आहे.

तरी प्रस्ताव उपरोक्त प्रमाणे मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मुख्य कार्यालय इमारतीत मा.महापौर दालन, सर्व स.पदाधिकाऱ्यांची दालने, मा.आयुक्त दालन, निवडणूक विभाग, शहर अभियंता यांचे कार्यालय, आस्थापना-१ विभाग, विधी विभाग, नगर सचिव विभाग इ.विभागामध्ये तातडीने एकूण १५ नग **INVERTOR**(इन्व्हरटर) बसविण्यासाठी एकत्रित रू.५,४३,७५०/- चे अंदाजपत्रकास तसेच रूद्रा एंटरप्रायजेस यांच्या मार्फत सर्वात कमी दरानुसार म्हणजेच रू.३६२५०/- प्रति नग दराने इन्व्हरटर (खँीिशीींि) बसविण्याचे काम विना निविदा करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. अर्थसंकल्प पुस्तिका पृष्ठ क्र.१३४ वर अ.क्र.१५ वरील 'एन-९ प्रतापगडनगर खुली जगा विकसीत करणे व हॉल बांधणे' या कामासाठी ठेवण्यात आलेल्या र.रू.७.०० लक्ष मधील उर्वरीत रू.५.५० लक्षची आर्थिक तरतुद 'विद्युत साहित्य खरेदी' या लेखा शिर्षकाखाली वळविण्यास मंजुरी देण्यात येते. इन्व्हर्टर बसविण्याचे र.रू.५,४३,७५०/- चे कामाचा खर्च त्यातून भागविण्यात यावा. वैधानिक कार्यवाही व्हावी.

'' राष्ट्र गिताने'' सभा संपल्याचे मा. सभापती यांनी घोषीत केले.

**नगर सचिव**

महानगरपालिका औरंगाबाद